# टेंडर नोटिस

**तमाम लोकांस या टेंडर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,**

१. **मिळकतीचे वर्णन :** महाराष्ट्र राज्यातील महसुल विभाग नाशिक, तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक, नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे नाशिक या गावचे शिवारातील जुना आग्रा रोडवरील स्थावर मिळकत सिटी सर्व्हे नं ६६६६ व ६६६७ यांसी एकुण क्षेत्र ५२५.३६ चौरस मिटर या प्लॉट मिळकतींवर बांधलेल्या जुन्या बंगल्याचे बांधीव क्षेत्र २८५.४६ चौरस मिटर तसेच आऊट हाऊस जागेचे बांधीव क्षेत्र ५३.३७ चौरस मिटर, जुना बंगला व आऊट हाऊस मिळुन एकुण बांधीव क्षेत्र ३३८.८३ चौरस मिटर यांसी म्युनिसिपल घर नंबर १३६२जी या बांधीव बंगला व आऊट हाऊसचे पुर्वीचे नाव श्रीकांतकुंज व आताचे नाव परशुराम भवन असे आहे. या एकुण मिळकतीच्या चतु:सिमा पुर्वेस–जुना आग्रारोड, पश्चिमेस–सिटी सर्व्हे नंबर ६६६८ व ६६६९, दक्षिणेस–सुमन विहार नावाचा बंगला आणि उत्तरेस–सिटी सर्व्हे नंबर ६६६४ येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक असलेली प्लॉट मिळकत व त्यावरील बांधीव बंगला व आऊट हाऊस हि मिळकत.

२. वर वर्णन केलेली मिळकत चित्तपावन ब्राम्हण संघ, गोळे कॉलनी, नाशिक मे.धर्मादाय आयुक्त साहेब यांचेकडील नोंदणीकृत न्यासाचे मालकीची आहे. **वरील मिळकत जशी आहे तशी, आहे त्या परिस्थितीत चित्तपावन ब्राम्हण संघाने विक्री करण्याचे अथवा जागेच्या बदल्यात बाजारभावाप्रमाणे २५ ते ४० किलोमिटरच्या परिघाच्या आत जागा घेण्याचे ठरविले आहे.** सदर मिळकतीबाबतची तपशीलवार माहिती संस्थेच्या कार्यालयात ठेवलेली आहे. वरील मिळकत खरेदी घेण्यास ज्या व्यक्तीला स्वारस्य आहे, अशा व्यक्तीस जागेची पहाणी करण्याची व्यवस्था जागेचे ठिकाणी केलेली आहे.

३. सबब सर्व संबंधीतांना या जाहिर टेंडर नोटीसीने कळविण्यात येते की, या जाहिर टेंडर नोटीसचा विषय असलेली वरील मिळकत ज्या कोणाला विकत घेण्याची अथवा जागेच्या बदल्यात बाजारभावाप्रमाणे २५ ते ४० किलोमिटरच्या परिघाच्या आत जागा देण्याची असेल त्या व्यक्तीने त्याची निविदा चित्तपावन ब्राम्हण संघ, गोळे कॉलनी, नाशिक यांच्या कार्यालयात सिलबंद पाकीटात दिनांक २५.१०.२०१८ पावेतो सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत समक्ष आणुन द्यावी. सदर निविदेसोबत सिलबंद पाकीटात रक्कम रुपये १०,००,०००/–(अक्षरी रक्कम रुपये दहा लाख मात्र) चा चित्तपावन ब्राम्हण संघ, नाशिक या नावाने डिमांड ड्राफ्ट कार्यालयात जमा करावयाचा आहे. सदर दिनांक २५.१०.२०१८ पावेतो सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत आलेल्या संपुर्ण निविदा दिनांक २९.१०.२०१८ रोजी सायंकाळी ६.०० वाजता उघडल्या जातील, त्यावेळी सर्व निविदा धारकांनी समक्ष हजर रहावे, याची नोंद घ्यावी.

४. वर वर्णन केल्याप्रमाणे ज्या निविदा धारकाची निविदा स्विकारली जाईल त्यानंतर मे. धर्मादाय आयुक्त साहेब अथवा सक्षम अधिकारी यांचेकडुन परवानगी मिळाल्यानंतरच वरील मिळकतीचे खरेदीखत केले जाईल. सदर आलेल्या सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण हक्क विश्वस्त मंडळाचा असुन कुठल्याही व्यक्तीला त्याबातीत हस्तक्षेप करता येणार नसुन त्याबाबतची विचारणा करता येणार नाही.

कळावे, हि टेंडर नाटीस, नाशिक तारीख १०/१०/२०१८

**अध्यक्ष,**

**चित्तपावन ब्राम्हण संघ, नाशिक**